

# भूग्राम EcoVillage-आपले भवितव्य

गेल्या दोन शतकांतील औद्योगिक विकासामुळे शहरीकरणात लक्षणीय वाढ झालेली आहे. याचा परिणाम म्हणून पर्यावरणाच्या गुणवत्तेत तेवढीच लक्षणीय घट झालेली आपल्याला आढळते. यावर उपाययोजनेचा विचार विचारवंतांनी करणे अपेक्षित आहे. गेल्या दोन वर्षांत आपण कोरोना महामारीचा जो अनुभव घेतला त्या काळात तर हा विचार सर्वसामान्य माणसांच्याही मनात आला असल्यास नवल नाही.

जगात झपाट्याने पसरणारी रोगराई, महामारी यांतून निसर्ग आपल्याला धोक्याच्या सूचना नेहमीच देत असतो. संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विभागाच्या मुख्य अधिकारी इंगर अँडरसन म्हणतात, ''आपल्या हातून सातत्याने केल्या गेलेल्या निसर्गाच्या ऱ्हासामुळे आपण रोगराई असणाऱ्या वन्य प्राण्यांच्या इतके जवळ गेलो आहोत की त्या रोगांचा मानवाला कधीही संसर्ग होऊ शकतो.''

अशा वेळी आपण सद्य परिस्थितीचा एक आढावा घेतला तर आपल्या मनात काही प्रश्न येतील :

१. निसर्गापासून दूर शहरांची वाढ आपल्यासाठी चांगली आहे काय?

२. आपल्या विकासाच्या आतापर्यंतच्या कल्पना आणि योजना बरोबर आहेत काय, की त्यांवर आपण पुनर्विचार करावयास हवा?

३. आपण निसर्गाच्या नियमांशी जुळवून घेऊन राहू नये काय?

४. ग्रामीणीकरण ही आजच्या काळाची गरज आहे काय?

वरील प्रश्नांचा आपण एका वेगळ्या दृष्टिकोणातून विचार करून बघू. जर पृथ्वीला आपण एक शरीर किंवा जीव मानले तर? गेल्या शेदीडशे वर्षांत या शरीराचे तापमान अंश दीड–अंश वाढले आहे असे शास्त्रज्ञ आपल्याला सांगतात. म्हणजे या शरीराला ताप आला आहे असे आपण समजू. याचे कारण

काय? तर या पृथ्वीवर चाललेले अनेक मानवनिर्मित उद्योग! जेम्स वॉटने वाफेवर चालणाऱ्या इंजिनाचा शोध लावल्यानंतर औद्योगिक क्षेत्रात जलद गतीने प्रगती झाली आणि अनेक कारखाने जगभर उभारले गेले. कारखान्यांतून निघणाऱ्या निरुपयोगी वस्तू (धूर, सांडपाणी, घनकचरा) प्रदूषणात वाढ आणि त्यायोगे पर्यावरणाची हानी करत्या झाल्या. कारखान्यांच्या व्यतिरिक्त दळणवळणात देखील प्रचंड वाढ झाली. त्यामुळे इंधनाचा वापर वाढला आणि हवेतील कर्बवायूचे प्रमाण वाढले. याचसोबत प्रचंड प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळे या कर्बवायूचा वापर करून घेण्यासाठी पुरेशी झाडे आता उरलेली नाहीत. कर्बवायू पृथ्वीवरील तापमान वाढवण्यास कारणीभूत आहे. हेच पृथ्वीला झालेल्या रोगाचे लक्षण नाही काय?

निसर्गाचे काही मूलभूत नियम आहेत. निसर्गाचा सूक्ष्मतेने अभ्यास केल्यास निसर्गाची रचना परिपूर्ण असल्याचे आपल्याला आढळते. निसर्गात चुका होत नाहीत. निसर्गातील घडामोडी नैसर्गिक नियमांनुसार अव्याहत सुरू असतात. नैसर्गिक जीव देखील निसर्गाच्या नियमांप्रमाणे जीवनयापन करतात. कुठलाही परिवेष आणि त्यात प्रगट होणारे जीव एकमेकांसाठी उपयुक्त, परस्परपूरक असतात. उपयुक्त परिवेश उपलब्ध असल्याशिवाय जीव प्रगटतच नाही. कुठलाही जीव त्याच्या गरजेपेक्षा जास्त वस्तूंचा उपयोग करीत नाही; उपभोग तर अजिबातच घेत नाही. याला अपवाद फक्त एकच, दुर्दैवाने, मनुष्य. वस्तूंच्या उत्पादनात भरमसाठ वाढ झाल्यामुळे पर्यावरणाची किती हानी झाली आहे ते आपण बघतच आहोत.

कोरोना काळात आपण अनेक अनावश्यक उद्योग बंद करून केवळ अत्यावश्यक सेवा सुरू ठेवल्या होत्या. याचा परिणाम पर्यावरणाची गुणवत्ता उंचावण्यात झालेला आपल्याला दिसला. ताळेबंदीच्या काळात अनेक शहरांच्या वायुप्रदूषणात लक्षणीय घट झालेली आपल्याला दिसली. दिल्लीतील यमुनेच्या पाण्याची गुणवत्ता सुधारली. या सर्व गोष्टी आपल्याला शिकवतात की आपण अनेक अनावश्यक वस्तूंशिवाय विनासायास राहू शकतो. या सर्व अनावश्यक वस्तूंचा वापर आपण कायमचा बंद केला तर?

कुठल्याही परिवेशाचे स्वास्थ्य व सन्तुलन त्या परिवेशातील जैवविविधतेवर अवलंबून असते आणि तिच्यातूनच प्रकट होते. एखाद्या प्रजातीची संख्या जर प्रमाणाबाहेर वाढली तर ती इतर जीवांसाठी आणि अनुषंगाने स्वतःसाठीही अपायकारक ठरू शकते. याचे अलीकडील काळातील उदाहरण म्हणजे मनुष्य. मनुष्याची संख्या १९०० साली अंदाजे १५० कोटी होती. गेल्या १२० वर्षांत ती पाच पटींपेक्षा जास्त झाली आहे. मनुष्याची संख्या जेवढी वाढली त्यापेक्षाही जास्त वाढ वस्तूंच्या निर्मितीत झाली आहे. या सर्व वस्तूंचे करायचे काय हे निसर्गाला समजलेले नाही. मर्यादित संसाधनांवर कितीतरी जास्त पटीने निचरा करण्याचे ओझे टाकले जात आहे. त्यामुळे निसर्गाची प्रदूषण सामावून घेण्याची आणि निचरा करण्याची क्षमता (assimilative capacity) आता बऱ्याच जागी उरलेली दिसत नाही. निसर्गाच्या दृष्टीने बघितले तर मानवाचा कधीही न संपणारा लोभ हाच पृथ्वीसाठी विषाणू नाही का? या लोभामुळे ज्या वस्तू आपण बनवल्या त्यांमुळे आपले भौतिक जीवन सुखकर झाले आहे यात शंका नाही परंतु निसर्गाची हानी झाली आहे हेदेखील नाकारता येणार नाही.

शेतीतून उत्पन्न वाढवण्याच्या अट्टाहासापायी रासायनिक खतांचा वापर अमर्याद वाढला आहे. त्यामुळे अन्ननिर्मितीचे प्रमाण वाढले परंतु गुणवत्ता घसरली आहे. पाणी, जमीन, हवा प्रदूषित झाले आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे शहरांचा श्वास कोंडला आहे. सिमेंटच्या जंगलांमुळे शहरांचे तापमान खेडेगावांच्या तुलनेत नेहमीच जास्त असते. जमिनीवर सुपीक मातीचे प्रमाण घटले आहे. भूगर्भातील पाणी

उपसले गेल्यामुळे जमीन अनेक जागी शुष्क झालेली आहे. कां महत्त्वाचे आहेत हवा, पाणी, माती, झाडे? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधताना असे जाणवते की आपण निसर्गापासून दूर गेलो असल्यामुळे निसर्गाची जी हानी झाली आहे ती भरून काढायची असेल तर पुन्हा एकदा निसर्गाकडे परतून आपला आणि निसर्गाचा समतोल प्रस्थापित करण्यास हातभार लावावयास हवा.

अवाढव्य वाढलेली शहरे आणि ओस पडलेली गावे यांचा आपण समन्वय साधू शकलो तर? शहरांच श्वास थोडा मोकळा होऊन गावांना संजीवनी मिळेल. गावे समृद्ध, संपन्न होतील. गावातील लोकांचे जीवनमान उंचावेल. भौतिक सुखसुविधा, शिक्षण, आरोग्य, नोकरीचे विविध पर्याय उपलब्ध होतील. निसर्गापासून दूर गेले असलेलो आपण पुन्हा एकदा निसर्गाकडे परतलो तर आपला आणि निसर्गाचा समतोल पुन्हा एकदा प्रस्थापित होण्यास मदत होऊ शकेल. कोरोनाचा कहर हा शहरांमध्ये जास्त गंभीर स्वरूपात होता आणि गावांमध्ये तो कमी प्रमाणात होता. शहरीकरणाच्या नको असलेल्या परिणामांपासून आपली मुक्ती करण्यासाठी ग्रामीणीकरण हा त्यावर उत्तम उपाय असू शकतो.

कोरोनाच्या काळात बरीचशी कामे घरी बसून केली जात होती ती आजही घरूनच केली जात आहेत. कोरोनाने आपल्याला बळजबरीने घरी बसवून विचार करण्यास भाग पाडले आहे. शहरातील लोकांसाठी अशी सक्ती आवश्यक होती असे कधीकधी वाटते कारण शहरी जीवनाच्या जीवघेण्या शर्यतीत धाव धाव धावून त्यांचे शारिरीक आणि मानसिक आरोग्य धोक्यात आले होते. कोरोनाने अत्यावश्यक मूलभूत गरजा आणि अनावश्यक चैन याची स्पष्ट जाणीव शहरातील लोकांना करून दिली.

ज्यांना शहरातील धकाधकीचे आयुष्य नको आहे ते नक्कीच गावाकडे जाऊन राहू शकतात. फोन, आंतरजाल (इंटरनेट), दळणवळणाच्या सहज उपलब्ध असणाऱ्या सुविधांमुळे जग खूपच जवळ आले आहे. लहान गावात राहणे म्हणजे अश्मयुगात राहण्यासारखे आता राहिलेले नाही. आपल्या अत्याधुनिक शिक्षणाचा उपयोग आपण गरज असलेल्या गावांसाठी करून तिथे आपणही शांततेत, आरामात, निसर्गासोबत एकरूप होऊन कमी खर्चात राहू शकतो.

ग्रामीणीकरण करताना आपल्याला लक्षात ठेवायला हवे आपल्याला खेड्यांमध्ये नवीन शहरे उभारायची नसून तिथली प्राकृतिक संसाधने टिकून राहतील याची काळजी घ्यावयाची आहे. खेड्यातील जनजीवनाचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की कचऱ्याचे व्यवस्थापन, विनियोग खेड्यात चांगल्या प्रकारे होते. एकाचा कचरा तिथे दुसऱ्याचे अन्न असते. म्हणून जबाबदारीने त्याच वस्तू न्यायच्या ज्याचे व्यवस्थापन नैसर्गिक रीतीने होऊ शकेल.

आजच्या काळात आधुनिक सुविधांचा त्याग न करता निसर्गाच्या नियमांप्रमाणे जे आदर्श गाव असेल त्याला आपण भूग्राम (EcoVillage) म्हणू. अशी भूग्रामे जगभर सगळीकडेच प्रस्थापित करण्याची गरज आहे. भूग्रामाची ढोबळ परिभाषा म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, आणि नैसर्गिक संतुलन राखणारी टिकाऊ वस्ती. ही वस्ती निसर्गावर होणारा भार कमीतकमी राखण्याचा प्रयत्न करते – तिच्या भौतिक रचनेतून तसेच त्या वस्तीतील रहिवाश्यांच्या जीवनशैलीतून [Caves, R. W. (2004). Encyclopedia of the City. Routledge. p. 209]. भूग्रामातील लोक निसर्गाचा समतोल राखण्याचे त्यांचे उत्तरदायित्व जाणीवपूर्वक पार पाडतात, कर्बपदचिन्ह (carbon footprint) कमीत कमी असणारी जीवनपद्धती अंगीकारतात, आणि भूग्रामाच्या आसपासचा परिसर पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करतात.

आदर्श भूग्रामाची वैशिष्ट्ये:

१. पर्यावरणाला अनुकूल घरे
२. कृत्रिम रसायनविरहित नैसर्गिक सेंद्रीय शेती
३. सेंद्रिय शेतीतून सर्व अन्नघटक सरळ आपल्या ताटात
४. पाण्याचा पुनर्वापर, पुनर्भरण करता येईल असे नियोजन
५. अक्षय ऊर्जा स्रोत आणि संसाधनांचा वापर
६. नैसर्गिक हिरवळ, मैदान, आणि वृक्षवाटिका / देवराई
७. कचऱ्याचे नैसर्गिक पद्धतीने व्यवस्थापन – पुनर्वापर, सेंद्रीय खत, आणि ऊर्जा
८. आधुनिक दळणवळणाच्या सुविधा
९. चौकस मनाची जिज्ञासा पूर्ण करून चांगल्या आकांक्षांना वाव देणाऱ्या आदर्श शिक्षण संस्था
१०. वैविध्यपूर्ण उपक्रम, आरोग्य, सांस्कृतिक, आणि आध्यात्मिक प्रेरणा देणारी सामुदायिक केंद्रे

या सर्व गोष्टींचा समावेश सर्वच जागी शक्य असेलच असे नाही परंतु यापैकी जास्तीत जास्त गोष्टी समाविष्ट करण्याचा प्रयत्न व्हावा. काही गोष्टी (उदा. ९ आणि १०) तीनचार भूग्रामांसाठी एकच असल्या तरी पुरेशा असू शकतात.

भूग्रामांच्या प्रस्थापनेसोबतच आपण आपल्या वैयक्तिक जीवनाचा विचार करणे देखील आवश्यक आहे.

मनुष्य नेहमी आनंदात राहण्याच्या प्रयत्नात असतो. या आनंदाची ८ अंगे सांगता येतील :

१. भौतिक (उत्तम आरोग्य)
२. पर्यावरणीय (निर्मळ परिवेष)
३. भावनिक
४. बौद्धिक
५. आध्यात्मिक
६. आर्थिक
७. औद्योगिक / व्यावसायिक
८. सामाजिक

समृद्धी फक्त पैशानेच येते का? काय मूल्य देऊ शकतो आपण शुद्ध आणि मोकळ्या हवेचे? शुद्ध पाण्याचे? रसायनविरहित नैसर्गिक सेंद्रीय अन्नपदार्थांचे? ऐसपैस मोकळ्या जागांचे? लुकलुकत्या चांदण्यांचे? चांदण्या रात्रींचे? कोरोना महामारीने आपल्याला अशा या मौल्यवान नैसर्गिक संसाधनांची किंमत करावयास शिकवले आहे. घेणे आणि देणे ही देखील एक निसर्गाची महत्वाची प्रक्रिया आहे. आपल्याला ज्याची गरज आहे ते घ्या आणि नको असलेले द्या. आपल्याला जे नको आहे त्याचा विनियोग आणि उपयोग निसर्गाकडून सहजपणे केला जातो, आणि त्याचा निचरा होतो. त्यासाठी महत्वाची संसाधने म्हणजे हवा, पाणी, माती, झाडे. नेहमीच पुरून उरेल असा सूर्यप्रकाश तर आहेच.

आपल्या दैनंदिन जीवनात आपण ''साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'' या उक्तीचा अवलंब करणे आवश्यक आहे. इतर जीवांकडून आपण ''आवश्यकतेपेक्षा अधिक कुठलीही वस्तू ग्रहण न करण्याची'' शिकवण घ्यावयास हवी. मनुष्याच्या भौतिक गरजा आणि सुखसुविधा निसर्गाशी समतोल राखूनच पूर्ण झालेल्या उत्तम, तसेच त्यांचा अतिरेक नसलेला चांगला. भौतिक जीवन समृद्ध झाल्यानंतर मनुष्याला भावना आहेत. या भावनांना योग्य दिशा मिळाली तर आध्यात्मिक प्रगती देखील होऊ शकते. अशा प्रकारच्या गरजा, सुविधा, आणि आर्थिक, व्यावसायिक, तसेच सामाजिक सुसंधी जिथे उपलब्ध असतील अशा आदर्श भूग्रामांची स्थापना होण्यात आपल्या सर्वांचे तसेच निसर्गाचे कल्याण आहे.

◆

**डॉ. विक्रम पत्तरकिने**
पेन सिल्वेनिया अमेरिका
vikram.ecovillage@gmail.com